नोंदणी क्र. MSCS/CR/1282/2018 Dt. 27.03.2018 रिझर्व्ह बँक लायसन्स क्र. UBD/MH/1270 P दि. 09.08.1996

SANMATI SAHAKARI BANK LTD.

# सन्मती सहकारी बँक लि. इचलकरंजी

(मल्टीस्टेट को-ऑप बँक)

प्रधान कार्यालय :- ७/१११ जनता चौक, लक्ष्मी मार्केट इचलकरंजी ४१६११५ फोन नंबर (०२३०) २४३१३३३/३४, २४३१५३१/३२
Email: sanmatiucb@sanmatibank.com | Web.: www.sanmatibank.com

## ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

**सन्मती सहकारी बँक लि., इचलकरंजी (मल्टीस्टेट को-ऑफ बँक)**

**(फक्त सभासदांसाठी)**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, बँकेची सन २०२४-२०२५ सालची
**३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२४-०८-२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.**
**मराठा मंडळ सांस्कृतिक भवन, तांबे माळ, डी मार्ट जवळ, इचलकरंजी-४१६ ११५**
येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेसाठी बोलाविण्यात आली आहे.
तरी बँकेच्या सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, अशी नम्र विनंती आहे.

### * सभेपुढील विषय *

१. दि. ०३.०८.२०२४ रोजी झालेल्या ३०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि.**३१ मार्च** २०२५ अखेर लेखापरिक्षण झालेल्याचा ताळेबंद, नफातोटा पत्रक व अहवालाचा विचार करणे व स्विकृत करणे.
३. मा. वैधानिक लेखापरीक्षण यांचा सन २०२३-२०२४ सालच्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
४. सन २०२४-२०२५ चे वैधानिक लेखापरीक्षण पुर्ण झालेले असून तो ऑडीट मेमो स्वीकृत करणे.
५. सन २०२४-२०२५ सालात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२५-२०२६ सालाकरीता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६. सन २०२५-२०२६ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षकांची रिझर्व्ह बँकेने केलेल्या नेमणुकीस मान्यता देणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
७. सन २०२५-२०२६ सालाकरीता अंतर्गत कंकरंट व कर लेखापरीक्षकाची केलेली नेमणूकीस व मानधनास मान्यता देणे.
८. सन २०२४-२०२५ सालात बँकेचे संचालक व नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. वैधानिक लेखापरिक्षक यांनी बुडीत असल्याबद्दल प्रमाणित केलेली कर्ज खाती वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निर्लेखित करणेबाबत.
१०. सन २०२४-२०२५ मध्ये एकरकमी कर्ज परतफेड, तडजोड, बुडीत कर्जे योजने अंतर्गत व्याजामध्ये सवलत देवून कर्ज खाती भागवली याची नोंद घेणे.
११. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्ती मसुदा स्विकारणे व मंजुरी देणे.
१२. आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१३. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळेच्या विषयावर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाचे आदेशावरुन

स्थळ : इचलकरंजी
दिनांक : ०७/०८/२०२५

**श्री.अशोक आप्पासो पाटील**
(मुख्य कार्यकारी अधिकारी)

**श्री.सुनिल सातगोंडा पाटील**
(चेअरमन)

### * सभासदांसाठी महत्वाच्या सुचना *

(१) गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास त्यादिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासनंतर सभा भरेल व त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता असणार नाही, त्यात वरील विषयाचा विचार केला जाईल. (२) सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या लेखी सुचना व प्रश्न बँकेत कार्यालयीन वेळेत **दि. १६.०८ २०२५** पर्यंत पोहचतील अशा रितीने पाठवाव्यात (३) दि. **३१ मार्च** २०२५ अखेरचे ताळेबंद नफातोटा पत्रक व अहवाल बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेला आहे. याशिवाय बँकेच्या Website:- www.sanmatibank.com वेबसाईटवर प्रसिध्द केलेला आहे याची नोंद घ्यावी. (४) सभासदांनी आपला पत्ता बदललेला असलेस नवीन पत्ता बँकेस ताबडतोब लेखी कळवावा. (५) सभासदांनी जर शेअर्स सर्टिफीकेट अदयाप घेतले नसेलतर सभासदांनी बँकेतून घेवून जावे. जर घेवून हरवले असेलतर सभासदांनी इंडेम्नीटी बॉड लिहून देवून योग्य ती फी भरून नवीन शेअर्स सर्टीफिकेट घेवून जावे. (६) बँकेच्या पोटनियमानुसार प्रत्येक सभासदास शेअरबाबत वारस आपण सुचविणेचा आहे आपण वारसाचे नाव सुचविले नसल्यास त्याबाबतच अर्ज बँकेकडे सत्वरभरून देणेत यावा. (७) ज्या सभासदांनी ओळखपत्रासाठी अदयाप फोटो आणून दिलेले नाहीत त्यांनी ४ सेमी x ५ सेमी साईज दोन फोटो लवकरात लवकर बँकेकडे समक्ष देवून आपले ओळखपत्र घेवून जावे (८) आरबीआय यांच्या सुचनेप्रमाणे बँकेचे सर्व ग्राहक खातेदार व सभासद यांनी आपला ग्राहक ओळखा ची पुर्तता करणे सक्तीचे आहे. ज्या खातेदारांनी याची पुर्तता केलेली नाही त्यांनी संबंधीत शाखेशी संपर्क साधून केवायसी अदयावत कागदपत्रे सादर करावीत. (९) सभासदानी वार्षिक सभेला येताना आपले सभासद ओळखपत्र आणावे.

* टीप : सभासदांना वार्षिक अहवालाची प्रत नजीकच्या शाखा कार्यालयात दिनांक १६ ऑगस्ट २०२५ पासून मिळण्याची व्यवस्था केली आहे. *